**राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीची बहूल लोकसंख्या असलेल्या ९ जिल्हयातील मेंढपाळ कुटुंबांना प्रायोगीक तत्वावर राज्यस्तरीय योजनेंतर्गत चराईकरिता माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यासाठी चराई अनुदान देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः पविआ-१०१९/प्र.क्र.२१६/पदुम-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: १६ सप्टेंबर, २०१९

**प्रस्तावना :-**

राज्यातील भटक्या जमाती - क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध १३ नवीन योजना सुरू करण्यास मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून, सदर १३ योजनांमध्ये भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील मेंढपाळ कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रायोगीक तत्वावर प्रतिमाह रु. ६०००/- असे एकूण रु. २४०००/- चराई अनुदान देण्याचा विषय अंतर्भूत आहे.

२. मेंढपाळ कुटुंबीयांकडे असलेल्या मेंढयांच्या पालनपोषणासाठी सर्वसाधारणपणे शासकीय गायरान जमीनी, पडीक शेतजमीनी व डोंगर इत्यादी परिसरात मेंढपाळ त्यांच्या मेंढया चराईसाठी घेवून जातात. यापैकी जे क्षेत्र हे वन विभागाच्या अखत्यारीत असले, त्या क्षेत्रामध्ये मेंढपाळ व वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो, अनेक वेळा वाद-विवाद होतात. परिणामी, मेंढयांच्या पालनपोषणामध्ये अडचणी निर्माण होतात.

३. सदर अडचणीवर मात करण्यासाठी राज्यातील धनगर व तत्सम जमातीची बहूल लोकसंख्या असलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, कोल्हापूर, नाशीक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर या ९ जिल्हयामध्ये प्रायोगीक तत्वावर नवीन योजना सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

४. राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजाची बहूल लोकसंख्या असलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, कोल्हापूर, नाशीक, पुणे, सांगली, सातारा व सोलापूर या ९ जिल्हयामध्ये ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असेल अशा कुटुंबांना प्रायोगीक तत्वावर राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी

प्रतिमाह रु. ६,०००/- असे एकूण रु. २४,०००/- चराई अनुदान वाटप करण्याची योजना खालीलप्रमाणे राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

(१) सदर योजना राज्यस्तरीय योजनेंतर्गत राज्यातील धनगर व तत्सम जमातीची बहूल लोकसंख्या असलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, कोल्हापूर, नाशीक, पुणे, सांगली, सातारा व सोलापूर या ९ जिल्हयामध्ये प्रायोगीक तत्वावर राबविण्यात यावी.

(२) सदर योजनेंतर्गत राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजामधील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असेल, अशा कुटुंबांना सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून या योजनेचा लाभ देण्यात यावा.

(३) सदर योजनेमध्ये पात्र मेंढपाळ कुटुंबांना प्रतिमाह रु. ६०००/- याप्रमाणे माहे जून ते सप्टेंबर या ४ महिन्याच्या कालावधीसाठी एकूण रु. २४०००/- एवढे चराई अनुदान वाटप करण्यात यावे.

(४) जिल्हा निहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन प्रायोगीक तत्वावर उक्त ९ जिल्हयामध्ये प्रत्येक जिल्हयात २००० लाभार्थींना अनुदान देण्यात यावे.

(५) सदर योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येईल. तसेच योजनेस प्राप्त होणारा प्रतिसाद विचारात घेऊन, योजनेच्या उद्दीष्टामध्ये फेर बदल करण्याचा अधिकार महामंडळास राहील.

(६) या योजनेसाठी आवश्यक असणारा निधी विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडून उपलब्ध करुन, वितरीत करण्यात येईल.

**<u>५. योजनेचा उद्देश:-</u>**

(१) राज्यातील भटकंती करणाऱ्या धनगर व तत्सम समाजातील पशुपालकांना पारंपारिक पद्धतीने करीत असलेल्या मेंढी / शेळीपालन या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करून देणे व त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.

(२) माहे जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये मेंढपाळ कुटुंबाना मेंढयांच्या चराईच्या अनुषंगाने येणाऱ्या अडीअडचणी/ समस्या यावर मात करणे.

(३) राज्यातील मेंढ्यांच्या संख्येमध्ये सातत्याने होत असलेली घट थांबविणे किंबहुना त्यामध्ये वाढ करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

(४) राज्यातील मेंढी / शेळीपालन व्यवसायास चालना देऊन ग्रामीण रोजगार निर्मिती करणे.

**६. योजनेचे स्वरूप**:-

(१) सदर योजना राज्यस्तरीय योजनेंतर्गत राज्यातील धनगर व तत्सम जमातीची बहूल लोकसंख्या असलेल्या अहमदनगर, औरंगाबाद, धुळे, कोल्हापूर, नाशीक, पुणे, सांगली, सातारा व सोलापूर या७७७ ९ जिल्हयामध्ये प्रायोगीक तत्वावर राबविणे.

(२) सदर योजनेंतर्गत राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचीत केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजामधील उक्त जिल्हयातील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असेल, अशा कुटुंबांना सन २०१९-२० या वित्तीय वर्षापासून या योजनेचा लाभ देणे.

(३) या योजनेमध्ये पात्र मेंढपाळ कुटुंबांना प्रतिमाह रु. ६०००/- याप्रमाणे माहे जून ते सप्टेंबर या ४ महिन्याच्या कालावधीसाठी एकूण रु. २४०००/- एवढे चराई अनुदान वाटप करणे.

**७. योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती**:-

(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत योजनेस व्यापक प्रसिद्धी देऊन, याकरिता जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत अर्ज मागविण्यात येतील. त्यानुसार खालील निवड समिती मार्फत लाभार्थींची निवड करण्यात येईल:-

| | | |
|---|---|---|
| (i) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | - | अध्यक्ष |
| (ii) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| (iii) संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | - | सदस्य |
| (iv) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय | - | सदस्य सचिव |

(२) निवड करण्यात आलेल्या लाभार्थींची अंतिम यादी प्रसिद्ध करून त्यानुसार लाभधारकांना लाभ देण्यात येतील.

(३) निवड झालेल्या लाभार्थ्यांना महामंडळामार्फत अनुदानाची रक्कम थेट हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

**८. कार्यन्वयन यंत्रणा**:-

राज्य क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, लि. पुणे यांचेद्वारे करण्यात येईल.

९. सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्याची कार्यवाही विभागाच्या स्तरावर करण्यात येईल.

१०. सदर आदेश विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१०/उस, दिनांक १६.८.२०१९, नियोजन विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.१३१/१४३१, दिनांक १९.८.२०१९ व वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ३८४/व्यय-२, दिनांक २८.८.२०१९ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१८००२९५००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKAS TULSHIRAM KADAM

Digitally signed by VIKAS TULSHIRAM KADAM
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=406cb152e109154a7466c0050f88e5a437e17838973824687653a5e8d144b72b, ou=AGRI AND ADF DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIKAS TULSHIRAM KADAM
Date: 2019.09.17 12:52:59 +05'30'

**( विकास तु. कदम )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे- ६७.
३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
७. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
८. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
९. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१०. मा. मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१२. विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवड नस्ती (पदुम- ३).